# विद्यापीठात पोर्तुगीज अभ्यासक्रम

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा विभागात ३० ऑगस्ट २०१९ पासून एक वर्ष कालावधीचा 'पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम' सुरु होत आहे. यासाठी प्रवेश सुरु आहेत. त्याद्वारे पोर्तुगीज भाषा कौशल्य प्राप्त करून करियर संधी मिळवण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागामार्फत करण्यात आले आहे.

पोर्तुगीज ही जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या मातृभाषांमध्ये सहाव्या क्रमांकाची भाषा आहे. युरोप, आफ्रिका, दक्षिण अमेरिका व आशिया खंडात आठ देशांत पोर्तुगीज ही अधिकृत भाषा आहे. जगातील अनेक देशांतील शाळांमध्ये ती शिकवली जाते. चीनच्या मकाउच्या अधिकृत भाषांपैकी



एक पोर्तुगीज आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाची सातवी अधिकृत भाषा म्हणून पोर्तुगीजला मान्यता मिळावी, यासाठी एक चळवळ सुरु आहे. पोर्तुगीज भाषा ही इंग्रजीच्या जवळची असल्याने शिकायला सोपी आहे. पोर्तुगीज भाषा शिकल्यानंतर स्पॅनिश भाषा शिकणे सोपे जाते. पोर्तुगीज संस्कृती समजून घेण्यास भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे. पोर्तुगाल, पोर्तुगीज भाषिक राष्ट्रे व भारत यांच्यातील वाढते व्यापारी संबंध लक्षात घेता दिल्ली, मुंबई, पुणे, बेंगळूरू, हैद्राबाद, चेन्नई अशा महानगरी शहरांत बहुराष्ट्रीय कंपन्यांना पोर्तुगीज भाषा तज्ज्ञांची मोठी गरज आहे. पोर्तुगीज भाषेचे ज्ञान इतिहास संशोधक व अनुवादकांसाठीही करिअरच्या अनेक संधी निर्माण करते.

> “पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम' हा एक वर्ष कालावधीचा असून दर शुक्रवार व शनिवारी सायंकाळी त्याचे तास होणार आहेत. भविष्यात पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्र, गोवा या संस्थेशी 'सामंजस्य करार' होण्याची प्रक्रिया सुरु आहे. तेव्हा ही भाषा अवगत असणाऱ्या युवकांना विविध शैक्षणिक संधी उपलब्ध होऊ शकतात.
>
> – मेघा पानसरे, विभागप्रमुख

# 'पर्यटन उद्योगाला मोठा वाव'

कोल्हापूर : 'जगात पर्यटन उद्योगाची वाढ वेगाने होत आहे. लोकपर्यटनासाठी वेगळे बजेट ठेवत आहेत. त्यामुळे भविष्यात पर्यटन हे एक उद्योग क्षेत्र म्हणून विस्तारणार आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. डी. एच. पवार यांनी व्यक्त केले. ते विवेकानंद कॉलेजच्या भूगोल विभागाच्यावतीने आयोजित पर्यटन व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

डॉ. पवार म्हणाले, '१९५० साली दोन कोटी लोकांनी पर्यटन केले होते. ते प्रमाण आज सव्वाशे कोटीपर्यंत गेले आहे. याचाच अर्थ पर्यटन हा उद्योग म्हणून नावारुपास येत आहे. या उद्योगात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होत आहेत. यासाठी पर्यटन, व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे ज्ञान घेऊन आपण स्वतंत्र व्यवसाय सुरु करण्याची संधी आहे. तसेच पर्यटन व्यवसायातील नोकरीच्या संधीचा लाभ घेऊ शकता. यामध्ये सहल व्यवस्थापक, सहल गाइड, सहल कंपनी संचालक, टूर ब्लॉग रायटर, सहल जाहिरात इत्यादी पर्यटन क्षेत्रातील रोजगाराच्या संधी तरुणांना खुणावत आहेत.'



डॉ. डी. एच. पवार

मटा एज्युकेशन

प्राचार्य डॉ. होनगेकर म्हणाले की, कोल्हापूर जिल्ह्यात पर्यटनासाठी खूप वाव आहे. त्यानिमित्ताने कोल्हापुरात कृषी पर्यटन व मेडिकल टुरिझम या क्षेत्रात अनेक रोजगाराच्या संधी प्राप्त होत आहेत.'

प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय अभ्यासक्रम समन्वयक प्रा. जी. एस. उबाळे यांनी केले. भूगोल विभाग प्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 AUG 2019
पुण्यनगरी

# पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा विभागात ३० ऑगस्ट २०१९ पासून एक वर्ष कालावधीचा 'पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम' सुरू होत आहे. त्याचे प्रवेश सुरू आहेत. त्याद्वारे पोर्तुगीज भाषा कौशल्य प्राप्त करून करिअर संधी मिळवण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागामार्फत करण्यात आले आहे.

'पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम' हा एक वर्ष कालावधीचा असून दर शुक्रवार व शनिवारी सायंकाळी त्याचे तास होणार आहेत. भविष्यात पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्र, गोवा या संस्थेशी 'सामंजस्य करार' होण्याची प्रक्रिया सुरू आहे. तेव्हा ही भाषा अवगत असणाऱ्या युवकांना विविध शैक्षणिक संधी उपलब्ध होऊ शकतात. प्रवेश व अधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 AUG 2019
तरुण भारत

# विद्यापीठात पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा विभागात ३० ऑगस्ट २०१९ पासून एक वर्ष कालावधीचा 'पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम" सुरु होत आहे. यासाठीची प्रवेश प्रक्रीया सुरु झाली आहे. तरी पोर्तुगीज भाषा कौशल्य प्राप्त करून करियर संधी मिळवण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागामार्फत करण्यात आले आहे.

**विदेशी भाषा विभागाची माहिती**

पोर्तुगीज जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या मातृभाषांत सहाव्या क्रमांकाची भाषा आहे. युरोप, आफ्रिका, दक्षिण अमेरिका व आशिया खंडात आठ देशांत पोर्तुगीज ही अधिकृत भाषा आहे. जगातील अनेक देशांतील शाळांत ती शिकवली जाते. चीनच्या मकाउच्या अधिकृत भाषांपैकी एक पोर्तुगीज आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाची सातवी अधिकृत भाषा म्हणून पोर्तुगीजला मान्यता मिळावी, यासाठी चळवळ सुरु आहे.

पोर्तुगीज भाषा ही इंग्रजीच्या जवळची असल्याने शिकायला सोपी आहे. पोर्तुगीज भाषा शिकल्यानंतर स्पॅनिश भाषा शिकणे सोपे जाते. पोर्तुगीज संस्कृती समजून घेण्यास भाषा हे एक महत्वाचे साधन आहे. पोर्तुगाल, पोर्तुगीज भाषिक राष्ट्रे व भारत यांच्यातील वाढते व्यापारी संबंध लक्षात घेता दिल्ली, मुंबई, पुणे, बेंगळूरू, हैद्राबाद, चेन्नई अशा महानगरी शहरांत बहुराष्ट्रीय कंपन्यांना पोर्तुगीज भाषा तज्ज्ञांची मोठी गरज आहे. पोर्तुगीज भाषेचे ज्ञान इतिहास संशोधक व अनुवादकांसाठीही करियरच्या अनेक संधी निर्माण करते. तरी प्रवेश व अधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 AUG 2019

तरुण भारत

# नाईट कॉलेजमध्ये ५ सप्टेंबरपासून मोडी लिपी अभ्यासक्रम सुरू

कोल्हापूर

मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यासाठी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, कोल्हापूरच्या मराठी विभागाच्या वतीने 'मोडीलिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम" ५ सप्टेंबर २०१९ ते ५ ऑक्टोबर २०१९ या एक महिन्याच्या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मान्यताप्राप्त यां कोर्समध्ये मोडीलिपीचे वाचन व लेखन यांचे संपूर्ण प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. नाईट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ या वेळेत कोर्स होणार आहे. प्रवेशासाठी इयत्ता १० वीं उत्तीर्ण असावे. इच्छुकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे (मो. ९४२१०२४०५५) यांच्याशी संपर्क साधावा, असें आवाहन प्राचार्य डॉ. एस. जेफ.फराकटे यांनी केले आहे. शासकीय–निमशासकीय कामांसाठी, जातीच्या दाखल्यांसाठी, न्यायालयीन कामकाजासाठी महसूल कागदपत्रांसाठी तसेच संशोधनासाठी मोडी कागदपत्रे वाचणाऱ्या तज्ज्ञांची अत्यंत आवश्यकता आहे. मोडी शिकल्यानंतर मोडी कागदपत्रांचे भाषांतर करून करिअर व स्वयंरोजगाराच्या तसेच शासकीय–निमशासकीय पातळीवर नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.